# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मा. ह प्रभाग समिती
## विशेष सभा
## सभावृत्तांत

दिनांक –२७/०४/२०१८

वेळ : दु.४.१५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा शुक्रवार दिनांक २७/०४/२०१८ रोजी दु ४.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले मा.पीठासीन अधिकारी श्री.अशोक काकडे (भा.प्र.से) मुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण, आगरकर नगर, पुणे ४११००१ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.सुजाता सुनिल पालांडे
२. मा.आशा धायगुडे-शेंडगे
३. मा.कांवळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.सोनवणे शारदा हिरेन
६. मा. उषा उर्फ माई मनोहर ढ़ोरे

याशिवाय श्रीम. राऊत आशा संपत, प्र. क्षेत्रीय अधिकारी, श्री.प्रदिप बाराथे, लेखाधिकारी ह प्रभाग समिती, हे उपस्थित होते.

-------

पीठासीन अधिकारी

सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. ह प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) मा. ह प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण ३ (तीन) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | मा.चौगुले सीमा दत्तात्रय |
| २ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | मा.सोनवणे शारदा हिरेन |
| ३ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे | मा.संतोष बबन कांबळे |

प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकुण ३ (तीन) नामनिर्देशन पत्र पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

पीठासीन अधिकारी

मा. ह प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे ३ (तीन) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन तिन्ही अर्ज वैध आहेत. त्यामध्ये मा. ह प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारी अर्जमागे घेण्यासाठी दुपारी ४.२० ते ४.३५ याप्रमाणे वेळ देणेत आलेली होती. दिलेल्या वेळेत त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

मा. ह प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे), नियम २००७ मधील नियम ६ नुसार मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ह प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

Ashok Kakade.

श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## मा. ह प्रभाग समिती
## विशेष सभा

ठराव क्रमांक – १

दिनांक –२७/०४/२०१८

विषय क्रमांक – १

विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत या उमेदवाराने एकूण ३ (तीन) नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेली आहेत. ह प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ह प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

Ashok Kakade

श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ह क्षेत्रीय कार्यालय,
क्रमांक : हक्षेका/१०/कावि/५७/२०१८
दिनांक : २७/०४/२०१८

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८
## ह प्रभाग समिती सभापती निवडणुक २०१८

ह प्रभाग समिती सभापती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत |

दिनांक - २७/०४/२०१८

Ashokkakade

श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८
## ह प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१८

| अ.क्र | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १ | निरंक |

दिनांक – २७/०४/२०१८

Ashok Kakade

**श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१